# हवामान आधारीत कृषि सल्ला


## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com


**८) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०३.०२.२०२३**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (२८/०१/२०२३ ते ०३/०२/२०२३) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०४/०२/२०२३ ते ०८/०२/२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२८** | **२९** | **३०** | ३१ | ०१ | **०२** | ०३ | **दिनांक** | **०४** | **०५** | **०६** | **०७** | ०८ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| २८.८ | ३०.० | ३१.२ | २९.० | २९.० | २७.५ | २९.८ | **कमाल तापमान (अं. से.)** | २९ | ३३ | ३४ | ३५ | ३५ |
| १२.० | १२.० | १२.५ | १४.० | १७.० | १८.० | १८.५ | **किमान तापमान (अं. से.)** | ११ | ११ | १२ | १३ | १४ |
| **ढगाळ** | **अ:ढगाळ** | **अ:ढगाळ** | **अ:ढगाळ** | **अ:ढगाळ** | **अ:ढगाळ** | निरभ्र | **ढग स्थिती (आकाश)** | **अ:ढगाळ** | निरभ्र | निरभ्र | **अ:ढगाळ** | **अ:ढगाळ** |
| ६३ | ५९ | ६३ | ६० | ५६ | ५० | ५५ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)** | २६ | २२ | २३ | २५ | २९ |
| २८ | २५ | ३१ | ३० | ४२ | ३४ | ३१ | **दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)** | १५ | १२ | ११ | ११ | ११ |
| ४.3 | ४.० | ४.८ | ४.५ | १०.० | १२.४ | ८.२ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ७.९ | ८.३ | ७.७ | ८.० | ८.५ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| **पीक** | **अवस्था** | **कृषि विषयक सल्ला** |
|---|---|---|
| हवामान सारांश | | **पुढील पाच दिवसांमध्ये हवामान थंड व कोरडे राहण्याची शक्यता आहे तसेच आकाश दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी निरभ्र तसेच उरलेल्या दिवशी अंशतः ढगाळ व उरलेले दिवस निरभ्र राहील. कमाल तापमान २२-२९ डिग्री सें. व किमान तापमान ११-१५ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे तसेच वा-याचा वेग ७.७-८.५ कि.मी/.तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा उपयोग करावा.<br>कोरडे हवामान लक्षात घेऊन गहु, हरभरा, फळबागा व भाजीपाला पिकास पाण्याची पाळी द्यावी.<br>वाटाणा पिकावर भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी पाण्यात मिसळणारे गंधक २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारावे.<br>वाटाणा पिकातील शेंगा पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २० ई. सी.@ २० मिली किंवा कोराजन@ ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात किंवा ४% निंबोळी अर्काची फवारणी करावी.<br>कोबी व फुलकोबी पिकावरील गड्डा पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी ४% निबोंळी अर्काची फवारणी करावी. अळीचा प्रादुर्भाव जास्त असल्यास स्पिनोसॅड २.५ एस सी (SC) १२ मिली प्रति १० लिटर पाण्यातुन फवारावे. |
| संदेश | | कणसे उन्हात वाळवून झाल्यानंतर मळणी / उफणनी करावी व साठवणुकीपूर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी. |
| रब्बी ज्वारी | काढणी | कणसे उन्हात वाळवून झाल्यानंतर मळणी / उफणनी करावी व साठवणुकीपूर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी. |
| उन्हाळी भुईमुग | पेरणी | उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी हेक्टरी ५ टन शेणखत/ सेंद्रिय खत जमिनीत मिसळावे.<br>उन्हाळी भुईमुग १५ जाने. ते १५ फेब. दरम्यान पेरणी करावी व पेरणीपूर्व बियाण्यास PSB व रायझोबियम या जीवाणूखते १० ग्राम प्रती किलो तसेच ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची ५ ग्राम प्रती किलो प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.<br>**किंवा** |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | उन्हाळी भुईमुगाची बिज प्रक्रिया करुन पेरणी करावी. बिजप्रक्रियेसाठी ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा, २५ ग्रॅम भुईमुग गटाचे रायझोबियम व २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणारे जिवाणु चोळावेत.<br>भुईमुग पिकाला डी.ए.पी. (DAP) ५० किलो प्रती एकर पेरताना द्यावे.<br>भुईमुग पिकाचे सुधारित वाण जसे फुले उन्नती, टी.ए.जी.-२४, टी.जी.-२६, टी.पी.जे.-४१, जे.एल.-५०१, एस.बी.-११, फुले भारती खरेदी करावे. |
| गहू | दाने भरण्याची अवस्था | गहु पिकामध्ये मावा व रसशोषणा-या किडीच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्साम २५ डब्लू.जी@ १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी.<br>गहू पेरणी नंतर ५५ व ७० व्या दिवशी १९:१९:१९ ह्या विद्राव्य खताचे २%@ २० ग्रॅम प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारणी दिल्यास उत्पन्नात वाढ होते. |
| हरभरा | काढणी/ घाटे भरण्याची अवस्था | जिरायती हरभरा पिकांच्या वाणांची पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी.<br>बागायती हरभऱ्यासाठी घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी द्यावे.<br>हरभरा पिकावरील घाटे अळीचे एकात्मिक कीड नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% नंतर १०-१५ दिवसांनी कोऱ्याजन @ २ मि.ली. प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारावे. त्यानंतर आवश्यकता असल्यास हेलीओकील १० मि.ली. प्रती १० लि. पाण्यातून फवारावे.<br>पक्ष्यांना बसण्यासाठी पक्षीथांबे तयार करावेत.<br>**किंवा**<br>हरभऱ्यावरील घाटे अळीचा नियंत्रणासाठी रासायनिक कीटकनाशक क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी.@ २.५ मिली किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ एस. जी.@ ४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून (सरासरी १० अळ्या प्रती झाड आढळून आल्यास) फवारणी करावी |
| आंबा | | आंबा पिकावरील मोहराच्या संरक्षणासाठी व तुडतुडे किडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. @ ३ मिली प्रती लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा मेटारायझीयम अनिसोप्ली किंवा व्हरटीसिलीयम लेकानी किंवा कॉन्फिडॉर @४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>आंबा पिकावरील मोहराच्या संरक्षणासाठी व बुरशीच्या नियंत्रणासाठी गंधक@ ३० ग्रॅम प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| द्राक्षे व डाळिंब | | थंडीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी सकाळच्या वेळी ठिबक सिंचन च्या सहाय्याने पाणी द्यावे.<br>द्राक्षावरील भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन कोनाझोल ०.५ मिली प्रती लि. पाणी किंवा मायक्लोबुटानील ०.४ ग्रॅम प्रती लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी (बागेच्या अवस्थेनुसार व काढणी पूर्व हंगाम विचारात घेऊन रोगाच्या तीव्रतेनुसार लेबल क्लेम असलेली तसेच शिफारस केलेली औषधे फवारणी करावी). |
| कांदा | | कांदा पिकावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-४५ (०.३%) ३ ग्रॅम प्रती लिटर किंवा टेब्यूकोनाझोल (०.१ %) १ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून हे बुरशीनाशक १० ते १५ दिवसांच्या अंतराने आलटून - पालटून फवारावेत **किंवा** डायथेन एम-४५ २.५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>कांदा पिकावरील रसशोषक किडींच्या (फुलकिड/मावा) नियंत्रणासाठी फिप्रोनील ५ एस सी@ २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे **किंवा** लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५% ईसी ६ मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. फवारणी करताना चिकट द्रव्याचा वापर करावा. |

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | कांदा पिकावरील फुलकिडे (थ्रीप्स) आणि करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बोसल्फान २५ ईसी@ २ मिली + ट्रायसायक्लाझोल (७५ डब्ल्यूपी) १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. फवारणी करताना चिकट द्रव्याचा वापर करावा. |
| पशुधन | जनावरांची हिवाळ्यात घ्यावयाची काळजी | जनावराना रात्री गोठ्यात ठेवावे आणि थंडीपासून बचाव वा संरक्षण करण्यासाठी गोठा कोरडा ठेवावा. कुक्कुटपालनात, शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन पिल्ले गरम ठेवा.<br>लहान करडे/ कोकरे/ वासरे यांचे थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यायला आलेले जनावरांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जनावरांच्या गोठ्यांना बारदान / शेडनेटचे पडदे लावावेत. तसेच गोठ्यामधील उष्णता टिकून राहण्यासाठी ५०० ते १००० व्हॅटचे बल्ब गोठ्यामध्ये कमी उंचीवर लावावीत. शक्य झाल्यास गोठ्यामध्ये शेकोटी पेटवावी. गाभण जनावरांना व छोटया जनावरांना रात्रीच्या वेळी वाळलेले गवत/ कडबा/ गोणपाट यांची बिछायत टाकावी. गोठा कोरडा राहील याची कटाक्षाने काळजी घ्यावी. त्यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा. थंडीचे प्रमाण जास्त वाढल्यास जनावरांच्या अंगावर गोणपाट बांधावे. विशेषतः गाभण गायी-म्हशींची जास्त काळजी घ्यावी. जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरकी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास फॅट आणि प्रथिनयुक्त आहार यांचा वापर वाढवावा. क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे, जेणेकरून गवतावर दहिवर नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत.<br>सर्दीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास जनावरांच्या नाकाभोवती टरपेंटाईनचा बोळा फिरवावा. सर्दीचा रंग हिरवट-पिवळसर असल्यास तातडीने पशुवैद्यकाच्या सल्ला घ्यावा. जनावरांचे पिण्याचे पाणी अतिथंड नसावे. जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिव

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**

ठिकाण : विकृसंके, इगतपुरी

दिनांक : ०३. ०२.२०२३